23 JUN 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सारथी'च्या जागेला 'राजाराम'चा पर्याय

## कॉलेजजवळील जागा देण्याची मागणी : मराठा समाजातून आग्रह : जागेसाठी आंदोलन करु लागू नये तज्ज्ञांची अपेक्षा



सारथीचे उपकेंद्र अद्यावत, भव्य असावे, त्यामध्ये शाहू महाराजांच्या कार्याची माहिती देणारे दालन असावे, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे राजाराम कॉलेजजवळील दहा-पंधरा एकर मिळाली तर ती जागा उपयुक्त ठरेल.

**- इंद्रजित सावंत, इतिहास संशोधक**

**संजीव खाडे**
कोल्हापूर

राज्य सरकारने सारथीचे उपकेंद्र कोल्हापूरमध्ये सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. शाहू जयंतीदिनी २६ जून रोजी या संदर्भातील औपचारिक घोषणा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या उपकेंद्रासाठी शिवाजी विद्यापीठ, राजाराम कॉलेज, गव्हर्मेंट पॉलिटेक्निक, कृषी महाविद्यालय या परिसरात दहा ते पंधरा एकर जागा देण्यात यावी, अशी मागणी मराठा समाजातून होत आहे. सारथीच्या उभारणीपासून स्वायत्तेसाठी आजवर संघर्ष केल्यानंतर आता उपकेंद्राच्या जागेसाठी मराठा समाजाला आंदोलन करावे लागू नये, अशी अपेक्षाही मराठा समाजातील तज्ज्ञांकडून व्यक्त होताना दिसत आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या उपस्थितीत शनिवारी पुण्यात सारथीच्या मुख्य कार्यालयात बैठक झाली. या बैठकीत सारथीविषयीच्या अनेक प्रलंबित मागण्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मान्य केल्या. याच बैठकीत सारथीच्या उपकेंद्राची कोल्हापुरात उभारणी करण्यासही उपमुख्यमंत्री पवार यांनी परवानगी दिली. त्याचबरोबर जागेचा शोध सुरू करण्यासंदर्भात सूचनाही दिल्या. त्यावेळी शाहूपुरीतील बीटी कॉलेजच्या जागेचा विचार झाला होता. दरम्यान, उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर जिल्हा प्रशासनाने जागेचा शोध सुरू केला आहे.

### पालकमंत्री सतेज पाटील यांचा पुढाकार

सारथीचे उपकेंद्र कोल्हापुरात व्हावे, ही मराठा समाजाची मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने पालकमंत्री सतेज पाटील यांनीही राज्य सरकारच्या स्तरावर पाठपुरावा केला होता. परवानगी मिळाल्यानंतर पालकमंत्री पाटील यांनी सोमवारी आमदार चंद्रकांत जाधव, मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा सारथीचे संकल्पक वसंतराव मुळीक, इतिहास संशोधक इंद्रजित सावंत, देवस्थान समितीचे माजी अध्यक्ष गुलाबराव घोरपडे आणि सारथीचे अधिकारी यांना सोबत घेऊन सदर बाजार येथील शाहू कॉलेजच्या पिछाडीस असणारी सार्वजनिक बांधकाम विभागाची जागा, विचारे माळ येथील समाज कल्याण विभागाजवळील जागा, शिवाजी विद्यापीठ आणि राजाराम महाविद्यालय परिसरातील जागांची पाहणी केली.




### शिवाजी विद्यापीठ, राजाराम कॉलेजजवळील जागा द्या

सारथीच्या उपकेंद्रातून मराठा विद्यार्थ्यांच्या करिअरसंदर्भात विविध योजना, उपक्रम राबविण्यात येणार आहेत. राजर्षी शाहू महाराजांच्या कोल्हापुरातील हे उपकेंद्र भव्य दिव्य असावे. त्यामध्ये शाहू महाराजांच्या कार्याविषयी संपूर्ण माहिती देणारे आंतरराष्ट्रीय दर्जाचे दालन असावे, यासाठी मराठा समाजातील अभ्यासक, तज्ज्ञ आग्रही आहेत. उपकेंद्रासाठी किमान दहा ते पंधरा एकर जागा देण्यात यावी, अशी मागणी आहे. सद्य:स्थिती अशी जागा राजाराम कॉलेजकडून मिळू शकते. राजाराम कॉलेज राज्य शासनाचे आहे. त्यामुळे जागा मिळण्यास शासकीय पातळीवर अडचण निर्माण होणार नाही. या परिसरातील शिवाजी विद्यापीठ, गव्हर्न्मेंट पॉलिटेक्निक, कृषी महाविद्यालय, सायबर कॉलेज आदी शैक्षणिक संस्था असल्याने हा संपूर्ण परिसर शिक्षणाचे हब आहे. त्यामुळे या ठिकाणी सारथीच्या उपकेंद्राची उभारणी झाली तर त्याचा लाभ विद्यार्थ्यांना होणार आहे, असे मतही मराठा समाजातील तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.

### शाहू कॉलेजवळील जागेचा घाट

सारथीसाठी उपकेंद्रासाठी शाहू कॉलेजच्या पिछाडीस असणारी सार्वजनिक बांधकाम विभागाची निवडण्याचा घाट जिल्हा प्रशासनातील काही अधिकाऱ्यांनी घातल्याची चर्चा असून त्याला मराठा समाजातून विरोध असून राजाराम कॉलेजच्या परिसरातील जागेचा आग्रह धरला आहे.